ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

INTERLINK RESEARCH ANALYSIS
IRA

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VII, Issue - XIV, Vol.- V
Impact Factor 3.42 (GRIFI)
July 2016 To Dec. 2016

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

IMPACT FACTOR
3.42

RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognised
Research Journal Related to Higher Education for all ...

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIV, Vol. V
Year - 7 (Half Yearly)
(July 2016 To Dec. 2016)

Editorial Office :
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

Publisher :
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

EXECUTIVE EDITORS

Dr. Aloka Parasher Sen
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

Dr. Huen Yen
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City. (CHAINA)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

Dr. G.V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. Laxman Satya
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

Dr. Sadanand H. Gone
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

DEPUTY-EDITORS

Dr. S.D. Sindkhedkar
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Veera Prasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

Johrabhai B. Patel,
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

CO-EDITORS

Sandipan K. Gaike
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

Ambuja N. Malkhedkar
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

[illegible]
Interlink Research Analysis | IMPACT FACTOR 3.42 | ISSN [illegible]
[illegible]

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Empirical Study on Non Performing Assets of Indira Mahila Nagari Sahakari Bank | Suchita Annarao Patil, Dr. R. V. Tanshette | 1-7 |
| 2 | Major Environmental Problems Causing Threat to Agro-Development | Hanumant B. Deshmukh | 8-15 |
| 3 | Physical Education in India and other Country | Vijaykumar Jagdishchand | 16-23 |
| 4 | भारतीय परिवहन में रेल परिवहन का योगदान | गोपाल लडस | 24-27 |
| 5 | चिरंतन विकासाचा अभ्यास | डॉ. डी. जी. पाटील | 28-33 |
| 6 | मानवअधिकार आणि भारत - एक अवलोकन | डॉ. एस. पी. पाटील | 34-39 |
| 7 | महिला सबलीकरण : एक अवलोकन | डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे | 40-45 |
| 8 | महाराष्ट्र विधानसभेतील महिलांचा राजकीय सहभाग | दिलीपकुमार डी. क्षीरसागर | 46-50 |

RNI MAHMUL02805/2010/33451
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 3.42
Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016
ISSN 0976-0377


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

# महिला सबलीकरण : एक अवलोकन

डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

7 Research Paper - Political Science

**प्रस्तावना :**

आज संपूर्ण जगात महिला सबलीकरण विषयावर चिंतन व मनन होत आहे. या विषयाला एक आंदोलनाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. आज जगातल्या सर्व देशात स्त्री-पुरुष समानता, लैंगिक न्यायाची चर्चा होत आहे. त्यासाठी अनेक महिला चळवळी होत आहेत. स्त्रीवादी साहित्य लिहिले जात आहे. ज्यातून स्त्री-पुरुष हा भेद मिटविणे आणि एका लोकशाही समाजाची स्थापना व्हावी ज्यामुळे सामाजिक न्याय प्राप्त होईल. अर्थात स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक स्तरावर पूर्ण समानता प्राप्त होईल. मागील कांही दशकापासून महिला सबलीकरण विषयावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र व त्यातून बरीच चर्चा व संशोधन होत आहे. महिलांच्या प्रगती व कल्याण हेतू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न झाले आहेत. महिलांच्या अधिकारासाठी अनेक कायदे बनवले. परंतू महिला सबलीकरणासाठी महिलांना त्याविषयाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. जेणेकरुन त्या आपल्या हितासाठी योग्य त्या पाऊल उचलतील त्यांच्याकडून प्रयत्न झाल्याशिवाय इतर होणारे सर्व प्रयत्न निरर्थक आहेत. तसेच महिलांच्या प्रयत्नासोबतच कुटुंबाचे समर्थन अधिक महत्वाचे आहे.

**संशोधनात्मक आरखडा :**

प्रस्तुत लेख महिला सबलीकरणासाठी मागील दोन शासनाने कोणकोणते उपाय केले हे जाणून घेण्याच्या हेतूने लिहिला. महिला सबलीकरणाच्या विषय शासकीय धोरण व राजकीय पक्षाच्या अजेंड्याच्या मुख्य मुद्दा बनला आहे. यास गृहित मानून महिला सबलीकरणाच्या संकल्पनेचे

RNI MAHMUL02006/2010/33461 IMPACT FACTOR 3.42
Interlink Research Analysis
ISSN 0976-0377
Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016

...व्यवहारिक समीक्षण करण्यात आले. महिला सबलीकरणाशी संबंधीतच योजनांचा विचार व त्याची ...उपयुक्तता ही या शोध निबंधाची मर्यादा आहे. महिला सबलीकरणात पुरुषांच्या तुलनेत मुलींच्या ...प्रमाणात होणारी वाढ हा ही मुद्दा महत्वाचा असतो. याचे स्पष्टीकरण उदाहरणासह करण्यात ...या विषयाची योग्य मांडणी व्हावी यासाठी विश्लेषणात्मक व समीक्षणात्मक अभ्यास पध्दतीचा ...आधार घेण्यात आला.

बऱ्याचवेळेस कायद्याच्या उपयोग कमी पण दुरुपयोगच अधिक होतो. धन आणि बलाने ...सशक्त असणाऱ्या महिलांकडून त्यांच्या हितार्थ बनवलेल्या कायद्याचा दुरुपयोग होताना दिसतो. ...उदा. हुंडा प्रथा विरोधी कायदा - १९६१, कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा - २००५ इ. ...दुर्बल आणि कमकुवतांनाच कायद्याचा लाभ मिळावा हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ...नेहरुंच्या मते कायदा बनवल्यानेच सामाजिक समस्यांचे निराकरण होत नाही. त्याच इतर ...सोडवता येते. परंतू त्यास कायद्याचे स्वरुप देणे आवश्यक आणि अपरिहार्य आहे. त्यामुळे ...माध्यमांना योग्य बळ मिळेल. तसेच सक्षम चिंतन व लोकमतास एक निश्चित आकार देता ...

महिला सबलीकरण ही एक प्रदीर्घ प्रक्रिया आहे. त्यासाठी लोकांच्या मानसिकतेत बदल ...आवश्यक आहे. असे परिवर्तन करणे कठिण कार्य आहे. भारतीय महिलांना शिक्षणात कमी संधी ...त्यांना योग्य जेवण आणि आवश्यक आरोग्यविषयक सुविधा पण मिळत नाहीत. असंघटित ...महिलांना पुरुषांच्या तुलनेत कमी पगार मिळतो. याशिवाय महिला आपल्या कुटुंबाच्या ...योगदान देतात. तरी त्यांची उपेक्षा केली जाते. ती थांबावी म्हणून केंद्र सरकार गृहीणी ...तिच्या नवऱ्याने त्याच्या दरमहा उत्पन्नातील १० ते २० टक्के उत्पन्न दरमहा पत्नीच्या ...बँकेत तिच्या खात्यावर जमा करावे असा कायदा बनवण्याच्या प्रयत्नांत आहे.

भारतात केवळ जवळपास १०% महिला घरात प्रमुख असतील. जमीन आणि संपत्ती ...घरातील पुरुष सदस्यांच्या नावाने असते. त्यासाठी महिला फार कमी प्रमाणात निर्णय ...स्वतंत्र असतात. तसेच त्या मुलभूत साधनांच्या मालकीन कमीच असतात. जर एक स्त्री ...दृष्ट्या शक्तीशाली आहे. तर तिला सामाजिकदृष्ट्या सक्षम होणे सोईचे होते.

वर्तमानात कुटूंबासाठी उत्पन्न करणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. महिलांच्या काम ...कुटूंबाचे उत्पन्न वाढले. त्यामुळे घरातील धोरण निर्धारणातील तिचा सहभाग वाढला. ...वाढत गेले. कुटुंब व समाजात सन्मान मिळू लागला. त्यांना ओझे समजणे कमी झाले. ...त्यांच्या फक्त काम करण्याने आर्थिक सबलीकरण होणार नाही. कारण बऱ्याच ठिकाणी ...शोषण होते. कुटूंबाचे संपूर्ण काम करुन नौकरीची जबाबदारी पूर्ण करावी लागते.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

RNI MAHMUL02805/2010/33461 Interlink Research Analysis IMPACT FACTOR 3.42 ISSN 0976-0377 Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016 

घ्यावी लागते. त्यामुळे घरचेही काम करावे लागते. अन्यथा नौकरी सोडावी लागते. बऱ्याचदा आपल्या मिळकतीवर त्यांचा हक्कत नसतो. ते पुरुषांच्या हातात असते. महिलांचे सक्षमीकरण तेंव्हाच शक्य आहे जेंव्हा महिलांना आपले उत्पन्न पूर्ण खर्च करण्याचे स्वातंत्र्य असावे आणि संसाधानावर त्यांचे नियंत्रण असावे.

सहाव्या पंचवार्षीक योजनेपासून महिलांच्या योजनावध्द विकासासाठी धोरण बनवण्यास प्रारंभ झाला. आठव्या योजनेत विभिन्न क्षेत्रातील विकासाच्या लाभापासून महिलांना वंचित ठेवू नये हे निश्चित झाले. त्यांची उपेक्षा करु नये. विकासाचा लाभ त्यांनाही मिळावा. १९९३ मध्ये राष्ट्रीय महिला कोषाची स्थापना करण्यात आली. कारण गरिब महिलांच्या कर्जासंबंधीच्या गरजा पूर्ण व्हाव्यात. नवव्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या विकासाची योजना तयार करताना दोन धोरणांना सहभागी केले. एक महिला सबलीकरण हा प्रमुख उद्देश बनला. दुसरे महिलांसाठी विशेषत्वाने योजना बनवण्यात आल्या आणि महिलांशी संबंधित सेवा सुविधा उपलब्ध करण्याचे ठरले.

दहाव्या पंचवार्षिक योजनेत सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे अजेंड्याच्या स्वरुपात समर्थन करुन महिलांना शक्ति प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. महिलांच्या सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी सामाजिक सबलीकरणातून आर्थिक सबलीकरण आणि स्त्रीयांना न्याय देणे या मार्गाचा अवलंब करण्याचे ठरले. सबलीकरण ही मुळातच बहुआयामी संकल्पना आहे. त्यामुळे सर्व क्षेत्रात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या पसंतीचे कार्य करणे व निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आवश्यक आहे. घर आणि समाजात स्त्री-पुरुषा संबंधी भेदभावामुळे महिलांचे स्वातंत्र्य मर्यादीत झाले. त्यामुळे महिलांचे सबलीकरणासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

स्त्री-पुरुषांच्या जन्मदरात ही मुलींसोबतचा भेदभाव स्पष्टपणे जाणवतो. २०११ च्या जनगणनेनूसार १०० पुरुषांमागे ९४३ महिला आहेत. पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि राजस्थान यांसारख्या अनेक राज्यांत हे प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे. हरियाणातील पानीपत या शहरात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण देशात सर्वात कमी आहे. हरियाणात १००० मुलांमागे फक्त ८३४ मुली आहेत.

अंदमान निकोबार द्वीपसमुह, जम्मु, काश्मीर, सिक्कीम याही राज्यांत १००० पुरुषांच्या संख्येच्या तुलनेत ९०० पेक्षा कमी आहे. दमन आणि दीव तसेच दादर आणि नगर हवेलीत साधारणत: १००० पुरुषांच्या तुलनेत ६१८ आणि ७७३ महिला आहेत. या दोन्ही केंद्रशासित प्रदेशात प्रमाण अधिक कमी आहे. परंतू स्त्री-पुरुषांच्या प्रमाणात मागील अनेक वर्षांपासून केरळ त्यात पुढे

RNI.MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 3.42
ISSN 0976-0377
Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016

ADAT VYAPARI EDUCATION SOCI... DEGLOOR COLLEGE, DE...

पुरुषांच्या मागे ९९२ महिला आहेत. दक्षिणेकडील राज्यातील हे प्रमाण बऱ्याच प्रमाणात समाधानकारक आहे. त्याचे कारण त्या भागातील शिक्षणाचा वाढता प्रचार व प्रसार असावे. या राज्यातील स्थितीप्रमाणे अनेक राज्यांत प्रयत्न करावे लागतील. या राज्यातील आकडेवारी स्त्री-पुरुषांच्या प्रमाणात साम्यता आणण्यासाठी योग्य ती आशा पल्लवित करतात. स्त्री-पुरुष जन्म दराच्या प्रमाणात साम्यता आणणे अशक्य नाही. त्यासाठी बरीच मेहनत व प्रयत्न करावे लागतील.

महिलांच्या विकास व कल्याणासाठी डॉ.मनमोहन सिंग व नरेंद्र मोदींचे शासनानी अनेक प्रयत्न केले. त्यात प्रामुख्याने महिला बँकेची स्थापना आहे. अर्थमंत्री पी.चिदंबरम यांनी आपल्या अंदाजपत्रकात २०१३-१४ च्या भाषणात १००० करोड रुपयांची रक्कम महिला बँकेच्या स्थापनेसाठी देण्याची घोषणा केली. देशातल्या पहिल्या महिला सरकारी बँकेने १९ नोव्हेंबर २०१३ पासून काम करण्यास प्रारंभ केले. ग्रामीण भागातही अशाच प्रकारच्या बँका खोलल्या जातील. ज्या ठिकाणी अशाच प्रकारच्या बँकिंग सुविधा नाहीत. पण काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे अशा ठिकाणी बँकेची स्थापना करावी असे निर्देश भारतीय रिजर्व बँकेने दिले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी लाल किल्यावरुन भाषण करताना मुलगा-मुलगी हा भेदभाव नष्ट करण्यासाठी आवाहन केले. मुलीला मुलांच्या तुलनेत कमकुवत मानणे ही आमच्यातील एक सामाजिक विचारसरणी आहे. महिला सुरक्षितता आणि समाजात महिलांना सन्मानजनक स्थान मिळवून देणे मोदी शासनाचे मुलभुत ध्येय आहे. त्यामुळेच मोदी शासनाने २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात महिला सबलीकरणासाठी अनेक महत्वपूर्ण पाऊल उचलून योजना बनवल्या. ज्यात निर्भया निधीसाठी १००० करोड रुपये दिले. २६ जानेवारीला रेल्वेमंत्र्यांनी महिला डब्यात सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्याची घोषणा केली. मुलींच्या शिक्षण आणि विवाहासाठी सुकन्या समृद्धी योजनेचा प्रारंभ केला. बेटी बचाओ-बेटी पढाओ हा कार्यक्रम दिला. मोदींच्या मते लोक मुलींना शिकवत नाहीत पण शिकलेली सुन मिळावी म्हणतात. मुली शिकल्याच नाहीत तर शिकलेली सुन कशी मिळेल. स्वच्छता अभियानाअंतर्गत स्त्रीयांसाठी स्वच्छतागृह निर्माण करण्यावर अधिक भर दिला. जागतिक बँकेच्या मतानूसार भारतात ६० करोड लोकांजवळ स्वच्छतागृहाच्या सुविधा नाहीत. त्याचे मुख्य कारण कुपोषण आहे. वर्तमानात जगातील जवळपास २.५ अरब लोकांकडे स्वच्छतागृह नाही. एक अरब लोक खुल्या वातावरणात शौच करतात. अलिकडेच बिहार राज्याने ज्याच्या घरी शौचालय नाही त्यांना राज्याच्या पंचायती राजसंस्था आणि शहरी स्थानिक स्वराज्यसंस्थेत सहभाग घेता येणार नसल्याचे स्पष्ट केले. त्याविषयीची दुरुस्ती बिहार राज्य सरकार पंचायतीराज कायद्यात करेल.

संयुक्त राष्ट्रसंघाने पहिल्या जागतिक स्वच्छता गृहाच्या दिवशी स्पष्ट केले की, जगात

RNI. MAHMUL02805/2010/33461
*Interlink Research Analysis*
IMPACT FACTOR 3.42
ISSN 0976-0377
Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S GLOOR COLLEGE, DEGLO

लागतात. स्वच्छता न ठेवल्यामुळे या लोकांच्या आरोग्य, शिक्षणावर परिणाम पडतो. तसेच महिला आणि मुलींच्या व्यक्तिमत्व आणि सबलीकरणावर नकारात्मक प्रभाव पडतो.

स्वच्छतागृहाची निर्मिती हा महिला सबलीकरणाच्या दिशेने पहिला महत्वपूर्ण प्रयत्न आहे. यामुळे त्यांना शारिरीक आणि सामाजिक सुरक्षा मिळते. शारिरीक शोषण कमी होते. त्यांना आत्मसन्मान आणि सुरक्षितता देण्याच्या दिशेने टाकलेले पहिले महत्वपूर्ण पाऊल आहे. जवळपास ७०% मुली कुपोषणाच्या बळी आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २५ सप्टेंबर २०१४ ला मेक इन इंडिया, स्किल इंडिया या कार्यक्रमाचा प्रारंभ केला. या दोन्ही उपक्रमाने महिलांना रोजगार आधारित प्रशिक्षण देण्याच्या योजना बनवल्या. लघु व कुटीर उद्योग, जुट, रेशीम उद्योग, हस्तशिल्प या क्षेत्रांचा समावेश या योजनांत करण्यात आला. यातुन प्रशिक्षण घेणाज्या महिला स्वतः आपला व्यवसाय चालू करतील. तसेच रोजगार मिळविण्यासाठी सक्षम बनतील.

मोदी शासनाने आपल्या अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या योजनाचे यशस्वीपणे कार्यान्वन झाल्यासच महिला सक्षमीकरण होईल. या सर्व योजनांचे वारंवार आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे. ज्यामुळे या योजनांच्या अंमलबजावणीत किती यश आले हे समजते. जबाबदार, पारदर्शक सुशासनच शासनाच्या सर्व योजनांना यशस्वी बनवू शकते. सध्याच्या नरेंद्र मोदी शासनात Good Governance सिध्दांत व्यवहारात येताना दिसतो.

**महिला आणि आरक्षण :**

महिला सबलीकरणाबाबत चर्चा करताना बज्याचवेळा आरक्षणाच्या तत्वाची चर्चा केली जाते. तर दुसरीकडे संसद आणि विधानसभेत महिलांना ३३% आरक्षण देण्याचा प्रस्ताव पास होत नाही. याशिवाय आरक्षणातून महिला सक्षमीकरण कमी व समस्याच अधिक वाढतील. पहिल्या टप्यात महिलांसाठी होणारी आरक्षणाची मागणीचा प्रमुख आधार धर्म होता. मुस्लिम महिलांना वेगळ्या आरक्षणाची मागणी केली जाते. त्यामुळे आरक्षणावर आरक्षण वाढेल. अनेक गुंतागुंत वाढेल. अल्पसंख्याक मंत्री नजमा हेपतुल्लांच्या मते महिला सबलीकरणासाठी आरक्षण हे समाधान नसून विकास समाधान आहे. पाकिस्तानच्या एकूण १४ करोड लोकसंख्येपैकी ०७ करोड महिला आहेत. या देशात महिलांसाठी शहरी संस्था, विधानसभा आणि संसदेत ३३% जागा आरक्षित आहेत. तेथील राष्ट्रीय असैंब्लित ७३ महिला संसद सदस्या आहेत. तरीही महिला सरंजामदारी आणि विविध समुहातील सरदारांच्या अहंकार व पुरुषांच्या शिकार आहेत. आजपर्यंतच्या लोकसभेत १०% पेक्षा कमी महिलांची उपस्थिती जाणवते. महिलांच्या १०% प्रमाणास अचानक ३३% करणे कितपत योग्य ठरेल हा ही मुद्दा विचार करण्याजोगा आहे. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभवमंटप या सामाजिक व धार्मिक वैचारिक पीठात महिलांना १०% सदस्यत्व दिले होते. ७०० सभासदांपैकी ७० महिला अनुभवमंटपाच्या सभासद होत्या. वर्तमान भारतीय राजकारणात जर

RNI MAHMUL02805/2010/33461 Interlink Research Analysis IMPACT FACTOR 3.42 ISSN 0976-0377
Issue : XIV, Vol. V, July 2016 To Dec. 2016 

स्वाभाविकपणे ३३% प्रमाणात महिला निवडणुका जिंकुन कायदेमंडळात आल्या तर ठिकच आहे. परंतू आरक्षणाच्या माध्यमातून महिलांची स्थान निश्चिती करणे कृत्रिम राजकारणाचे प्रतिक आहे. त्यामुळेच उमेदवारांची निवड करतानाच ३३% महिलांची निवड करावी. जर सर्वच राजकीय पक्षांनी वरीलप्रमाणे भूमिका बजावली तर स्वाभाविकपणे निवडणूक प्रक्रियेतून महिलांना ३३% जागा मिळतील.

भारतीय संसदेत महिलांचे अधिकार आणि हितांकडे डोळेझाक केल्याचे म्हणता येणार नाही. संसदेत आरक्षणाद्वारे महिलांचे प्रतिनिधीत्व वाढवून सबलीकरणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल पडेल असे म्हणणे संशयास्पद होईल. भारतात पहिल्या लोकसभेपासून २०१४ च्या लोकसभेत महिलांना मिळालेल्या प्रतिनिधीत्वाची आकडेवारी स्पष्ट करता येते. परंतू महिलांना त्यांच्या लोकप्रतिनिधींच्या सभागृहात मिळालेल्या प्रतिनिधीत्वाचा विचार करता स्वीडनचा नंबर प्रथम क्रमांकाचा येतो. स्वीडन हा जगातील पहिला देश आहे. जेथे १९७२ मध्ये महिलांसाठी पक्षात विशिष्ट कोटा आरक्षित करण्यात आला. महिलांना सर्वप्रथम कुटूंबाचे समर्थन व सहकार्य असावे, नंतर समाजाचे. तिला कुबड्याऐवजी समानतेची संधी उपलब्ध करुन द्यावी. महिला सबलीकरणासाठी न्याय व पोलिस प्रशासनात दुरुस्त्या कराव्या लागतील. पोलिस व न्यायालयाचा दुर्लक्षिपणा व हलगर्जीपणामुळे अनेक महिलांना न्याय न मिळालेल्या घटना नाट्य रुपांतरणात सावधान इंडिया व दस्तक या कार्यक्रमात दाखवले जाते. ४२ वर्षापर्यंत कोमात राहिल्यानंतर या जगाचा निरोप घेणारी मुंबईच्या के.ई.एम. दवाखान्यातील नर्स अरुणा शानबागला न्याय मिळाला नाही. उलट तिच्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या दवाखान्यातील वार्ड बॉय सोहनलाल तुरुंगतातून बाहेर सुटला. न्यायालयीन व्यवस्थेत सुधारणेची आवश्यकता आहे. त्याशिवाय सबलीकरण अपूर्ण आहे. त्यासाठी न्यायालयीन व्यवस्थेत सुधारणा कराव्यात. सर्व सामान्य नागरिकांची ही जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांना सक्षमपणे सहकार्य करण्याची भुमिका आम आदमीने बजावावी. महिलांच्या सर्वांगिण स्थितीत बदल करण्याच्या कामात प्रत्येक व्यक्तिचा दृष्टीकोण बदलल्याशिवाय समाजात सुधारणा घडत शक्य नाही. महिलांसाठी सामाजिक सुरक्षा योजना बनवणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या योजना अगोदरच आहेत. फक्त त्यात सुधारणा व अंमलबजावणी व्हावी.

## संदर्भ सूची :-


१. योजना, मार्च २०१५, केंद्रीय अंदाजपत्रक विशेषांक.

२. जनगणना-२०११.

३. क्रॉनिकल जानेवारी-२०१४.


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLUR Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded